प्रेसनोट दिनांक १४/०७/२०२२

दिनांक १२/०७/२०२२ रोजी रात्रौ ११.०० वाजता जोगेश्वरी पोलीस ठाणे हद दीतील ब्लु डार्ट एक्सप्रेस, पारसी पंचायत रोड, जोगेश्वरी पुर्व, मुंबई या कुरीयर कंपनीच्या वेअर हाऊस मध्ये तेथील कर्मचारी 'पार्सल्स' वेगवेगळे करीत असतांना, अचानक एका 'पार्सल' बॉक्सला आग लागली. त्याबाबत दिनांक १३/०७/२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजता ब्लु डार्ट कंपनीकडून जोगेश्वरी पोलीस ठाणेस माहीती देण्यात आली.

सदर माहीती प्राप्त झाल्यानंतर जोगेश्वरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी अंमलदार यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली, तेव्हा त्यांना सदर ठिकाणी जळालेल्या पार्सलमध्ये दिवाळीच्या फुलझडया, पाऊस, फटाके तसेच एक मोबाईल फोन व बॅटरीज्च्या सहाय्याने एक इलेक्ट्रीक सर्कीट तयार केल्याचे दिसुन आले. सदरची घटना गंभीर स्वरुपाची असल्याने जोगेश्वरी पोलीसांनी तात्काळ गुन्हा नोंद क्रमांक ३७८/२०२२ कलम २८५, ३३६, ४३५ भा.दं.वि सह कलम ३,४,५ बारी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करून तपास सुरु केला. पोलीसांनी ब्लू डार्ट या कंपनीकडून पार्सल पाठवणाऱ्या इसमाची प्राप्त माहीती व तांत्रीक मदतीने तपास सुरू केला.

सदर तपासा दरम्यान जोगेश्वरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सांताकुझ पुर्व, मुंबई भागातून एका अल्पवयीन बालकास ताब्यात घेउन केलेल्या कौशल्यपुर्ण चौकशीमध्ये विधीसंघ ा ग्रस्त बालकाने सांगीतले की, दोन महिन्यापुर्वी त्याने 'यु टयुब' वर एका बॅकेंची विमा सबंधी जाहिरात पाहीली होती. नमुद जाहीरातीत एखादी वस्तु/साहीत्याला प्रवासादरम्यान/ हाताळणीदरम्यान काही नुकसान झाल्यास सदर 'शिपमेंट व ट्रांझीट' पॉलीसीच्या माध्यमातुन इलेक्ट्रानीक वस्तुंसाठी वस्तुंची मुळ किंमत व त्यावर १०: नुकसान भरपाई दिली जाते. सदर माहितीच्या आधारे पैसे कमविण्याच्या उददेशाने दोन कॉम्प्युटर प्रोसेसर, मोबाईल, मेमरी इ. ९,८१,८००/— रूपये किंमतीचे साहित्य खरेदीची बनावट 'इनवॉईस' एका वेबसाईट दवारे बनवली.नमुद वस्तुंचा आय.सी.आय.सी.आय. (लोमबार्ड) या इन्सुरन्स कंपनीकडुन ऑनलाईन इन्सुरन्स पॉलीसी घेतली. त्यानंतर त्याने दिवाळीच्या फुलझडया, पाऊस, फटाके तसेच एक मोबाईल फोन व बॅटरीज्च्या सहाय्याने 'यु टयुब' पाहुन इलेक्ट्रीक सर्कीट चे पार्सल बनवले. त्या पार्सलवर वर नमुद साहीत्य असल्याचे शिपींग कार्ड तसेच दिल्ली येथील बनावट पत्ता टाकुन ब्लु डार्ट कुरीयर कंपनीकडे कुरीयर पाठवण्याकरता ऑनलाईन बुकींग केले. त्याप्रमाणे ब्लु डार्ट कर्मचारी यांनी नमुद मुलगा राहत असलेल्या सांताकुझ पुर्व, मुंबई परिसरातुन नमुद कुरीयर पिक अप करून घेउन आले.

सदर कर्मचारी यांनी नमुद पार्सल ब्लु डार्ट कंपनीच्या जोगेश्वरी येथील कार्यालयात आणुन हाताळत असतांना, सदर विधीसंघ ा ग्रस्त बालकाने

बनवलेल्या इलेक्टीक सर्कीट मधील मोबाईल फोनमध्ये सेट केलेला अलार्म होऊन नमुद पार्सलला आग लागली.

सदर गुन्हयात नमुद विधीसंघ ा ग्रस्त बालकाचा सहभाग नि पन्न झाल्याने त्याला ताब्यात घेऊन आज रोजी मा.बाल न्यायमंडळ ,डोंगरी येथे पाठविण्यात आले आहे. मा. बाल न्याय मंडळाने त्यास दिनांक २७/०७/२०२२ पर्यंत बाल निरीक्षण गृहात ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

नमुद गुन्हयाचा हेतू वगैरेबाबत पुढील तपास मा. वरि ठांच्या मार्गदर्शनाखाली जोगेश्वरी पोलीस ठाणे करीत आहे.